

अस्सल नूर, अस्सल ढंग जपणारा आवाज चांदण्याचा...

आशा भोसलेच्या आवाजातल्या विविध ढंगाच्या मराठी गाण्यांच्या एका रेकॉर्डला 'पाण्या तुझा रंग कसा?'हे मकं अन् अर्थवाही शीर्षक देण्याची कल्पना ज्या कुणाला चली असेल त्याला मनोमन दाद द्यायला हवी. गाण्यातला ठलाही प्रकार वर्ज्य न मानता तो अधिकाधिक निष्ठेनं, वढ्याच परिणानकारकतेनं आपल्या गळ्यातून आविष्कृत रण्याचं या गायिकेचं कसब अजोडच मानावं लागेल. आशा ... ा नावाभोवती जे वलय आज आहे त्याला ल्या पन्नास-बावन्न वर्षांतल्या तिच्या अथक साधनेची, रेश्रमांची पार्श्वभूमी आहे. काळाच्या रेट्याला थोपवून रणाऱ्या या 'चमत्कारा'ला सलाम करावाच लागेल! आशा सिलेला दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाल्याने सेकांच्या मनातील या भावनेला मूर्त स्वरूप मिळाले आहे. च्या अदाकारीवर फिदा असणारे रसिक हा पुरस्कार तिच्या ट्याला येण्यापूर्वीही 'सलाम आशा' असे आवर्जून णायचेच की!

रेल आवाज टिकून राहणारा दमसास, भाव ओतून ण्याची शैली, सुस्पष्ट उच्चार, अचूकतेचा ध्यास ही सगळी शिष्ट्ये लताप्रमाणे आशाच्याही गाण्यात दिसून येतात. कतीही उंच पट्टीतलं गाणं असू दे, आशानं ते समर्थपणे यलंय हे 'तू छुपी है कहाँ'(नवरंग)सारख्या गाण्यात तिनं याच्या पंचविशीत दाखवून दिलं होतंच. उत्तुंगतेचा तोच त्यय 'दिल चीज क्या है' (उमराव जान)सारख्या गाण्यात नं पन्नाशीत असताना दिला. 'कहिये तो आसमाँ को जमींपर तार लाए' म्हणतांना तिनं जणू आभाळालाच कवेत घेतलं होतं. ('उमराव जान'च्या गाण्यांसाठी आशाकडून आवाजाचा एक वेगळा पोत मला हवा होता अन् तो मिळावा यासाठी कितीतरी दिवस तिनं मेहनत घेतली होती, अशी आठवण संगीतकार खय्यामनं अलीकडेच सांगितली.)

'कर्नाटकी कशिदा मी काढिला' हे आशानं मराठी गाण्यात म्हटलं असेल. पण गाण्यातही तिची 'कशिदाकारी' पहायची तर नय्यर, दोन्ही बर्मन, जयदेव, रवी (होय रवीसुद्धा!) यासारख्या संगीतकारांसाठी तिनं गायलेल्या गाण्यांतून अनुभवता येल. 'अच्छा जी मैं हारी' (काला पानी)मधली 'चलो मान जाओ ना!' ही ओळ ती ज्या नाजुक विभ्रमांनी सजवते ते अनुभवून केवळ घायाळ होणंच आपल्या हाती उरतं. 'जनींसे हमे आसमाँपर' (अदालत)मधल्या 'बिठाके गिरा तो न दोगे' वर तिनं घेतलेली वळणं अशीच झुलायला लावणारी. जयदेवच्या 'रात के पिछले पहरों में' (अंजली)सारख्या अपघड चालींना तर तिनं न्याय दिलाच, पण याच जयदेवच्या 'अभी न जाओ छोडकर'मधल्या 'बस अब न मुझको टोकना' वरची तिची कारगिरी अशीच विलोभनीय अन् 'माँग में भरले रंग' (मुझे जीने दो)मध्ये तिनं भरलेला रंग तेवढाच दंग करून सोडणारा...

वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी मास्टर विनायक यांच्या 'बडी माँ'मध्ये लता अन् मीना या बहिणींसमवेत आशानंही पडद्यावर दर्शन दिलं होतं. लताचं पहिलंवहिलं हिंदी गाणं असलेल्या त्या चित्रपटात खास बंगाली पद्धतीची साडी नेसून देशभक्तीपर गाणं गाताना आशा दिसली होती. (त्याआधी १९४४च्या 'माझं बाळ' या मराठी चित्रपटातही आशा लतासमवेत पडद्यावर दिसली होती अन् त्यातल्या 'चला चल नवबाला' या गाण्यात तिचाही आवाज होता.)'बडी माँ' मध्ये आशानं गाणं म्हटलं नव्हतं. पार्श्वगायिका आशा भोसलेचा जन्म झाला तो १९४८ च्या 'चुनरिया'द्वारे. संगीतकार हंसराज बहलनं त्यातल्या 'सावन आया रे' या गाण्यात गीता दत्त अन् जोहराबाईसमवेत आशाचाही आवाज वापरला. इथून सुरू झाला गायिका आशाचा प्रवास. अनेक टप्पे, वळणं, अडथळे अन् खाचखळगे पार करीत तिची कारकीर्द घडत गेली, बहरत गेली. गेल्या अर्धशतकात तिनं गायलेल्या हिंदी चित्रपटगीतांची संख्या आठ हजारांच्या घरात जाते. शिवाय खासगी हिंदी गाण्यांबरोबरच मराठी अन् इतर भाषांमधली गाणी ती वेगळीच.

एक चुतुरस्र गायिका म्हणून तिची कामगिरी थक्क करून सोडणारीच आहे. कुठल्याही प्रकारातलं गाणं असो, आशानं त्यावर आपला ठसा उमटवलाच म्हणून समजावं. सहज आठवायला जावं तर तिची वेगवेगळ्या ढंगाची कितीतरी गाणी मनात गुंजारव करू लागतात. मग ते 'तेरा मन दर्पन' (काजल)सारखं भजन असो वा 'सूनी सूनी साँस की सितार' (लाल पत्थर)सारखं शास्त्रीय बाजाचं गाणं असो, 'इतनी बडी मेहफिल' (दिल अपना और प्रीत परायी)सारखं क्लब साँग असो वा 'रात अकेली है' (ज़्वेल थीफ) सारखं उन्मादक गाणं असो, 'सब से ये कह दो' (बँक मॅनेजर) सारखं मुग्ध हितगुज असो वा 'अंग लग जा' (मेरा नाम जोकर) सारखा भडक प्रणयाविष्कार असो, 'तंग् आ चुके हैं' (लाईट हाऊस) सारखी गझल असो वा 'साकिया आज मुझे नींद' (साहिब, बीबी और गुलाम) सारखा मुजरा असो, 'निगाहें मिलाने को' (दिल ही तो है) सारखी कव्वाली असो वा 'पान खाए सैंया' (तीसरी कसम) सारखं नौटंकी थाटातलं गाणं असो, 'आजा आजा मैं हूं प्यार तेरा' (तीसरी मंझिल) सारखा 'रॉक' प्रकार असो वा 'नदी नारे न जाओ' (मुझे जीने दो) सारखं लोकगीत असो, 'खोया खोया चांद' (दूर गगन की छाँव मे) सारखं अंगाई गीत असो वा 'खो दिये हैं सनम' (तेरी तलाश में) सारखं गूढ प्रकृतीचं (हॉटिंग) गाणं असो, 'सच हुए सपने' (काला बाजार) सारखा खट्याळपणा असो, 'अब के बरस भेज' (बंदिनी) सारखा दु:खी भावाविष्कार असो अथवा 'आली हाथ शाम आयी हैं' (इजाजत) सारखं उदासवाणं रितेपण असो... मानवी भावनांचे हे इंद्रधनुषी रंग आशानं ज्या मुक्तपणानं उधळले त्याला तोड नाही. खरं तर आठवणींची ही उजळणी करताना वेळ पुरू नये, एवढं प्रचंड काम तिनं करून ठेवलंय. तिच्याच एका खासगी गाण्याचा उल्लेख करून सांगायचं तर 'गीत कितने गा चुकी हूँ इस सुखी जग के लिए' अशी तिची अवस्था आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये घसरण सुरू असताना मनाला उभारी देणारे क्षण ज्यांनी बहाल केले, त्यात आशा हे एक ठळक नाव. 'अंबर की एक पाक सुराही बादल का एक जाम उठाकर घूंट चांदनी पी है हमने, बात कुफ्र की की है हमने...!' अमृता प्रीतमच्या लेखणीतून उतरलेला हा जीवनानुभव आशानं या ओळी प्रत्यक्षात गाऊन आम्हाला दिलाय. हा अस्सल नूर, अस्सल ढंग केवळ आशाचाच!

■ सुनील देशपांडे